विशेष लेखापरीक्षणाचे आदेश
देण्यापूर्वी घ्यावयाची दक्षता.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३६/कोषा प्रशा-४,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१७.

वाचा : शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. लेखाप १०९३/प्र.क्र.२६१/९३/लेखापरीक्षा, दि.१९.०६.१९९५.

शासन परिपत्रक:-

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ च्या नियम १५ अन्वये विशेष परिस्थितीत एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात जिल्हाधिकारी अथवा आयुक्त व ग्रामपंचायतींच्या संदर्भात मुंबई ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम १९६१ मधील नियम ८ नुसार जिल्हाधिकारी, पंचायत समिती, स्थायी समिती जिल्हा परिषद तसेच महानगरपालिकेसंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०८ नुसार राज्य शासन, नगर विकास विभाग हे विशेष लेखापरीक्षण करण्याची विनंती संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांना करू शकतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुखांकडून वारंवार विशेष लेखापरीक्षणाची विनंती केली जाते. नियमित लेखापरीक्षणात जे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत, त्याच लेखा आक्षेपांबाबत विशेष लेखापरीक्षण करण्याची समुचित प्राधिकाऱ्याकडून विनंती केली जाते. सदर लेखापरीक्षण कामाची पुनरावृत्ती झाल्याने अतिरिक्त मनुष्यदिन खर्ची पडतात .यास्तव विशेष लेखापरीक्षणाचे आदेश देण्यापूर्वी पुढील मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन होईल, याची पुरेपूर दक्षता घ्यावी.

**अ) ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांच्या संदर्भात विशेष परिस्थितीत खालील प्राधिकारी विशेष लेखापरीक्षणाची मागणी संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांना करू शकतात.**

१) महानगरपालिकेसंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०८ तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम १३८ नुसार राज्य शासन,नगर विकास विभाग.
२) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील नियम १५ नुसार जिल्हाधिकारी अथवा आयुक्त.
३) ग्रामपंचायत संदर्भात मुंबई ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम १९६१ मधील नियम ८ नुसार जिल्हाधिकारी, पंचायत समिती, स्थायी समिती जिल्हा परिषद.

**ब) विशेष लेखापरीक्षणाची मागणी करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांनी घ्यावयाची दक्षता :-**

१) एखाद्या संस्थेचे ज्या कालावधीचे विशेष लेखापरीक्षण प्रस्तावित केलेले आहे, त्या कालावधीचे नियमित लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून झाले असल्याबाबत खात्री करावी.
२) ज्या संस्थेचे विशेष लेखापरीक्षण करावयाचे आहे, त्या संस्थेचे सदर प्रकरणी प्रथम, प्राथमिक चौकशी करुन, प्राथमिक चौकशी अहवाल व या परिपत्रकासोबतच्या जोडपत्रातील माहिती स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडे पाठवावी. प्राथमिक चौकशीचे आदेश देणे तसेच प्राथमिक चौकशीचा अहवाल सादर करणे याबाबतची जबाबदारी विशेष लेखापरीक्षणाची मागणी करणाऱ्या प्राधिकाऱ्याची राहील.

**अपहारित रक्कम प्रकरणांतील प्राथमिक चौकशी अहवालात खालील गोष्टींचा समावेश असावा :**

१) अपहार कालावधी व त्यामध्ये गुंतलेली एकुण रक्कम.

३) विशेष लेखापरीक्षणासाठी आवश्यक ते सर्व अभिलेखे / कागदपत्रे विशेष लेखापरीक्षण पथकास विहित कालावधीत उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील. तसेच न्यायालयीन प्रकरणी अथवा पोलीस ठाण्यामध्ये जप्त / ताब्यात असलेली सर्व कागदपत्रे संबंधित कार्यालयांकडून प्राप्त करून विशेष लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत.

४) विशेष लेखा परीक्षणाची मागणी ज्या आर्थिक वर्षामध्ये केली जाईल, त्या आर्थिक वर्षाच्या मागील ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीची नसावी.

**क) खालील प्रकरणी विशेष लेखापरीक्षणाची मागणी मान्य केली जाणार नाही :-**

१) ज्या संस्थांचे / योजनांचे नियमित लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयामार्फत करण्यात येत नाही, अशा संस्था / योजनांचे विशेष लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडून करण्यात येणार नाही.

२) भांडार पडताळणी, प्रशासकीय निरीक्षणात आढळणाऱ्या त्रुटींसंबंधी , पदाचा कार्यभार हस्तांतरित करताना आढळून येणाऱ्या त्रुटी / उणिवा तसेच योजनेच्या किंवा विकास कामाच्या भौतिक पाहणीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटी /उणिवा यासंबंधी विशेष लेखापरीक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांना पाठविण्यात येऊ नये.

३) विशेष लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात आलेल्या गैरव्यवहारांच्या बाबींसंदर्भात नियमित लेखापरीक्षण अहवालामध्ये लेखाआक्षेप नोंदविण्यात आले असल्यास अशा बाबींसंदर्भात विशेष लेखापरीक्षणाची मागणी करण्यात येऊ नये.

४) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमित लेखापरीक्षणात आर्थिक गैरव्यवहार / अनियमितता उघडकीस आणल्या असतील तर अशा अनियमिततांसंदर्भात विशेष लेखापरीक्षणाची मागणी न करता नियमित लेखापरीक्षण अहवालाच्या आधारे संबंधित संस्था प्रमुखांनी सदर आर्थिक गैरव्यवहार /अनियमिततां संदर्भात पुढील कायदेशीर कार्यवाही करावी.

ड) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील नियम १५ नुसार **विशेष लेखापरीक्षणास मंजुरी देण्याबाबतचा संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य** यांचा निर्णय अंतिम राहील.

याद्वारे वाचा येथील शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. लेखाप १०९३/ प्र. क्र. २६१ /९३ / लेखापरीक्षा, दिनांक १९/०६/१९९५ निष्कासित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०५३०१३५३३२९५०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vandana Krishna

Digitally signed by Vandana Krishna
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0fcc377904ac87f7a5e5158674b1d40a2020cdaa95aa18dd49ffef7a9322f98b, serialNumber=88bb796a63074ccd9f97ddb710a5683f6d7ff0d85030986af2ef21e85f72c879, cn=Vandana Krishna
Date: 2017.05.30 13:58:45 +05'30'

**( वंदना कृष्णा )**
प्रधान सचिव, (लेखा व कोषागारे)

**सहपत्र** : जोडपत्र.

**प्रति,**

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता-१), महाराष्ट्र, मुंबई.

२. महालेखापाल, (लेखापरीक्षा-१), महाराष्ट्र, मुंबई.
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता-२), महाराष्ट्र, नागपूर.
४. महालेखापाल, (लेखापरीक्षा-२), महाराष्ट्र, नागपूर.
५. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
६. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकणभवन, ६ वा मजला, नवी मुंबई.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरीषद.
११. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई/ पुणे/नाशिक/अमरावती/ औरंगाबाद/नागपूर/ म.न.पा.ले.प.
१२. सर्व सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा.
१३. सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती.
१४. सर्व मुख्याधिकारी, नगर पालिका/परिषद
१५. निवड नस्ती, वित्त विभाग/ कोषा प्रशा-४.

## जोडपत्र

(महाराष्ट्र शासन ,वित्त विभाग ,परिपत्रक क्रमांक - ____________________ दि. ____________)

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील नियम १५ नुसार जिल्हाधिकारी अथवा आयुक्त व ग्रामपंचायतींच्या संदर्भात मुंबई ग्रामपंचायत )हिशेब तपासणी (नियम १९६१ मधील नियम ८ नुसार जिल्हाधिकारी ,पंचायत समिती ,स्थायी समिती जिल्हा परिषद तसेच महानगरपालिकेसंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०८ नुसार राज्य शासन ,नगर विकास विभाग यांनी विशेष लेखापरीक्षणाची विनंती करताना संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांचेकडे खालील माहिती भरुन पाठविणे आवश्यक आहे.

१. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे विशेष लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थेचे नाव
   (अ) तालुका :
   (ब) जिल्हा :
   (क) महसूल विभाग :

२. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडून संबंधित संस्थेचे नियमित लेखापरीक्षण कोणत्या वित्तीय वर्षापर्यंत झाले आहे. :

३. विशेष लेखापरीक्षण ज्या कालावधीचे आहे तो कालावधी (दिनांक ------ पासून -------- पर्यंत ) (कालावधी सलग नसेल तर प्रत्येक कालावधी स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा.) :

४. संशयीत आर्थिक गैरव्यवहारांचे थोडक्यात स्वरुप व त्यात गुंतलेली अंदाजित रक्कम. :

५. संशयीत आर्थिक गैरव्यवहारांची प्राथमिक चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम (सोबत प्राथमिक चौकशी अहवाल जोडणे आवश्यक आहे.) :

६. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत लेखापरीक्षणाची जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम :

७. अंतर्गत लेखापरीक्षण कोणत्या कालावधीपर्यंत झाले आहे. :

८. अंतर्गत लेखापरीक्षण झाले नसल्यास किंवा प्रलंबित असल्यास त्यामागची कारणे काय आहेत ? :

| | | |
|---|---|---|
| ९. ज्या बाबींचे विशेष लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या बाबी | : | १.<br>२.<br>३.<br>४. |
| १०. ज्या आर्थिक गैरव्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या संबंधीची सर्व कागदपत्रे उदा. धनादेश स्थळ प्रती, रोख नोंदवह्या, पावत्या, प्रमाणके, उपप्रमाणके व अनुषंगिक अभिलेखे इत्यादी उपलब्ध आहेत काय ? असल्यास ती कोणाच्या ताब्यात आहेत ? | : | |
| ११. वरील कागदपत्रे / अभिलेखे विशेष लेखापरीक्षणासाठी केव्हा व कोठे उपलब्ध करुन दिली जातील ? | : | |
| १२. अफरातफर प्रकरणी कागदपत्रे न्यायालयात अथवा पोलिस ठाण्यामध्ये जप्त / ताब्यात असलेल्या अशा अभिलेख्यांचे विशेष लेखापरीक्षण करणेबाबत विधी व न्याय विभागाची तथा ज्युडीशीअल मॅजिस्ट्रेट यांची परवानगी घेतली असल्यास त्याचा पत्र क्र. व दिनांक नमूद करावा. | : | |

**नगर विकास विभाग / विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी**
**अध्यक्ष, स्थायी समिती /सभापती,पंचायत समिती**
**यांची शिक्क्यासह स्वाक्षरी .**